

# -: श्री. संत चोखामेळा :-

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात इसवीसनाच्या १२ व्या शतकाचे आगळे महत्त्व आहे. याच काळात पंढरपूरच्या विठोबाची भक्ती करणारे अनेक संत होऊन गेले. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांच्या सहवासाने अध्यात्मनिष्ठ अभेद्य भक्तींच लोण तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचले. त्यापैकीच एक संत चोखोबा म्हणजे संत चोखामेळा.

चोखामेळा हे शूद्र गावगाडा समाजजीवन भौतिक व्यवहार उच्चनीचता आणि वर्णव्यवस्था यामुळे होरपळून निघाले. संवेदनशील भक्तीप्रवीण आत्मनिष्ठ असलेले संत चोखामेळा. आपल्याला त्यांच्या अभंगातून त्यांची व्यथा समजते. त्यांना देवळात प्रवेश नाकारल्यावर भगवंताच्या चरणी सगळी लेकरे समान असतात, हा भेदभाव का ? असा त्यांना प्रश्न पडे आणि ते व्यथित होत.

चोखोबा नावाप्रमाणे चोख होते म्हणजेच शुद्ध होते. आपल्या उपेक्षित बांधवांच्या उद्धाराची चिंता होती. त्यांना समान हक्क मिळावा म्हणून, समाजातील तेढ कमी व्हावी, जाती जातीतील भेदभाव नष्ट व्हावे म्हणून त्यांनी भक्ती मार्गाद्वारा प्रयत्न केले.

चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ होते. त्यांची पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, मेहुणे बेका महार व बहिण निर्मला असे सर्व कुटुंबच विठ्ठलाची भक्ती करीत. अतिशय सुंदर अभंग

रचना करीत. पत्नी बहिण मेहुणी मेव्हणा मुलगा असे सर्वजण (((भागवत सतत))) असलेले उदाहरण क्वचितच असेल.

रोज सकाळी चंद्रभागेमध्ये आंघोळ करून पांडुरंगाचे दर्शन देवळाच्या दारात उभे राहून ते घेत असत आणि त्या दर्शनाने तृप्त होत असत पण आपणास देवळात प्रवेश नाही याची खंत त्यांना वाटत असे  असे म्हणतात की एके दिवशी प्रत्यक्ष विठ्ठल देवळातून बाहेर आला आणि म्हणाला चल आत रोज बाहेरून दर्शन घेतोस आणि मला तुझी रोज आठवण येते हे ऐकताच चोखोबाचे डोळे भरून आले आणि एवढेच बोलू शकले, विठ्ठला तूच माझा मायबाप आहेस.

चोखोबाचे अभंग आजही लोकप्रिय आहेत. त्याची अभंग रचनेत भक्तीतीतील तळमळ, अध्यात्मिक उंची तर जाणवतेच त्याचबरोबर उपेक्षितेची खंत आणि वेदनेचा सूर जाणवतो तो आजही आपले अंत:करण हेलावून टाकतो, चोखोबांचे अभंग भक्तीच्या आद्रतेने ओलावलेले आहेत त्यातील सामाजिक जाणीव जितकी थोर, तितकीच त्यातली सामाजिक जाणीव थोर, तितकीच की ही वृत्ती ही महत्त्वाची मानावी लागेल. जीवनाचे खरे मर्म आणि अध्यात्माचे व्यवहारीपणा जाणलेला हा संत विचाराने मोठा आहेच आहे पण लिनतेमुळे जास्तच मोठा वाटतो.

- डॉ. ज्योतीराम कारंजकर.

व्यक्तिरेखा -

१. विठ्ठल - श्री. सुर्यकांत कुलकर्णी.

२. संत चोखामेळा - श्री. अमित पातील.

३. गावकरी - श्री. गिरीश कुलकर्णी

श्री. हृषीकेश गोसावी.

श्री. भूषण गरुड.

श्री. भास्करराव काणे.

श्री. उदय काणे.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. सारंग चव्हाण.

लोकेशन -

क्षेत्र माहुली, सातारा

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.

२. श्री. गणेश सावंत.

३. सौ. स्वप्नजा बर्वे.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. अद्वैय मुंढे.
२. श्री. शंतनू देशमुख.
३. श्री. महेश पुजारी.
४. श्री. गणेश सावंत.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकर.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन - डॉ. ज्योतीराम कारंजकर.
- लेख संकलन -

    श्री. दीपक आफळे.

- ध्वनीमुद्रण - सौ. अवंती कुलकर्णी.
- ध्वनिमुद्रिका -